**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. २४/२००९/ दिनांक :

श्री. मनोहर कृष्णाजी कुऱ्हाडे,
२१/१३६३, जवाहरनगर,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर
अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर
विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी.

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ब उप विभाग, इचलकरंजी.

**कोरम** :–१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०४.०८.२००९

श्री. मनोहर कृष्णाजी कुराडे यांनी रा. वॉर्ड नं. २१, घर नं. १३६३, इचलकरंजी या मिळकतीमध्ये १० एचपीचे मोटीव्ह पॉवर कनेक्शन उद्योगासाठी व सिंगल फेज घरगुती वापरासाठी मागणी अर्ज ९ जानेवारी २००७ रोजी केलेला आहे. वि.प.ने सदर मिळकतीमध्ये जूनी थकबाकी असल्याने रकमेचा भरणा होईपर्यंत नियमाप्रमाणे वीज जोडणी देता येणार नाही असे पत्राने कळविले आहे. सदरची थकबाकीशी माझा कांहीही संबंध नाही. माझे नुकसान होत आहे. तरी त्वरीत वीज जोडणी द्यावी व विलंबाबद्दल दंडात्मक कारवाई व्हावी म्हणून अंतर्गत कक्ष, कोल्हापूर यांचेकडे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचा निर्णय मान्य न झाल्याने सी.जी.आर.एफ. कोल्हापूर यांचेकडे ' अ ' नमुन्यात दि. २३.३.२००८ रोजी अर्ज दाखल केला.

अर्ज दाखल झाल्यावर सामनेवाला यांचेकडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व त्यानंतर ग्राहक तक्रार निवारण मंचच्या कार्यालयात दि.२०.४.२००९ रोजी व त्यानंतर विभागीय कार्यालय, इचलकरंजी येथे वि.प.च्या कार्यालयात दि. ४.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्योवेळी ग्राहक श्री. मनोहर कृष्णाजी कुराडे व वि.प.तर्फे श्री. शिंदे, उप कार्यकारी अभियंता, ' ब ' उप विभाग हे उपस्थित होते.

मूळ तक्रार अर्ज प्रकरणी दाखल केलेली कागदपत्रे, सुनावणी दरम्यानची कथने, अंतर्गत कक्षाचा निर्णय या सर्वांचे अवलोकन करता,सर्वसाधारणपणे ग्राहकाची तक्रार व मागणी व त्यासंदर्भात वि.प.ची भूमिका पुढील प्रमाणे –

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप व मागणी

श्री. मनोहर कुराडे यांनी वि.प.च्या इचलकरंजी उप विभागीय कार्यालयाकडे २१/१३६३ इचलकरंजी येथे १० एच.पी. मोटीव्ह पॉवर व घरगुती सिंगल फेज जोडणीसाठी ९ जानेवारी २००७ रोजी अर्ज केला. प्रोसेसिंग फी रु. ५०/– जमा केले. तथापि, सदर जागेत थकबाकी असलेने वीज जोडणी देता येत नसल्याचे वि.प.ने कळविले. सदरची थकबाकी रकमेस मी जबाबदार नाही अशी भूमिका श्री. मनोहर कुराडे यांची आहे. श्री. सदाशिव कुराडे यांच्याकडून ३० मार्च १९९५ रोजी सदरची मिळकत श्री. मनोहर कुराडे यांनी विकत घेतलेली दिसते. त्यांनी तसे खरेदीपत्राची नक्कल सादर केलेली आहे. त्वरीत जोडणी द्यावी व विलंबाबद्दल दंडात्मक कारवाई व्हावी अशी मागणी नोंदविली आहे. सदर जागेतील थकबाकी संबंधी सदरील थकबाकीदाराची माहिती वि.प.कडे मागितली आहे. तथापि वि.प.ने जुने रेकॉर्ड असल्याने ते उपलब्ध नसल्याचे कळविल्याने अर्जदार यांना सदरची थकबाकी मान्य नसल्याचे तक्रारीवरुन दिसून येते.

वि.प.ची भूमिका

ग्राहकाकडून वीज मागणीचा अर्ज आल्यावर औंद्योगिक ग्राहकांच्या जोडणीस मंजुरी विभागीय कार्यालय देत असल्याने सदर कार्यालयास अर्ज पाठविला परंतु सदर पत्त्यावर पूर्वीच्या खातेदाराकडे थकबाकी असल्याने रक्कम जमा केल्याशिवाय नवीन जोडणी देता येणार नाही अशी वि.प.ची ठाम भूमिका घेतली. सदरची सर्व तीन खाती सन १९८४ ते १९८९ दरम्यानची असल्याने सध्यस्थितीत मंजुरीचे कागदपत्र उपलब्ध नाहीत. ग्राहकाने थकबाकी व जोडणी संदर्भात वकीलांच्यातर्फे नोटीस दिली. त्यास वि.प.नेही लेखी उत्तर वकीलांच्यामार्फत पाठविले आहे. सदरची कनेक्शन सप्टेंबर २००४ पर्यंत चालू होती.

सदरील सर्व खातेदार हे अर्जदार यांचे सख्खे भाऊ असल्याने तसेच थकबाकीदार भावाचीच मिळकत घेतल्याने थकबाकीस अर्जदारच जबाबदार आहेत. त्यामुळे वीज जोडणी मंजुरी विभागीय कार्यालयात प्रलंबित आहे. ग्राहकाचे मुद्दाम नुकसान करण्याचा कोणताही हेतू नव्हता व नाही अशी भूमिका वि.प.ची आहे. वि.प.ने तक्रारदार श्री. मनोहर कुराडे यांच्याशी केलेला पत्र–व्यवहार व कायदेशीर नोटीस यांच्या प्रती मंचात सादर केलेल्या आहेत.

अंतर्गत कक्ष, कोल्हापूर सर्कल यांनी दिलेल्या निर्णयात सदर जागेवरील थकबाकी असल्याने नियमाप्रमाणे थकबाकी भरल्यानंतर पुढील जोडणी संदर्भातील कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. ग्राहकाची तक्रार व मागणी, वि.प.ची तक्रारी संदर्भातील भूमिका, अंतर्गत कक्षाचा निर्णय याचा एकत्रित विचार करता पुढील मुद्दे निष्कर्षासाठी उद्‌भवतात.

मुद्दा क्र. १ : तक्रारदार याने खरेदी घेतलेल्या मालकाची थकबाकी आहे काय ?
उत्तर : नाही. परंतु त्या जागेमध्ये दुसऱ्या नांवाने खाती चालू होती व ते थकबाकीदार आहेत.

मुद्दा क्र. २ : सदर थकबाकीदाराची कनेक्शन्स तक्रारदाराने खरेदी होण्यापूर्वीची आहेत काय ?
उत्तर : होय, पण त्याची कागदपत्रें वि.प.कडे उपलब्ध नाहीत.

मुद्दा क्र. ३ : थकबाकी कोणत्या सालापासून आहे ? वि.प.ने वसुलीसाठीची कायदेशीर कार्यवाहीचा अवलंब केला आहे का ?
उत्तर : दि. १३.२.२००२ पासूनची थकबाकी आहे. दि. १३.२.२००२ पासून सप्टेंबर २००४ पर्यंत थकबाकी असून ही कनेक्शन्स चालू आहेत. कोणतीही कायदेशीर कारवाई केल्याचे दिसत नाही.

मुद्दा क्र. ४ : तक्रार अर्जदाराने कोणाकडून जागा खरेदी घेतली ? त्याच्या नांवे किती थकबाकी रक्कम आहे ?
उत्तर : कैं. जनार्दन कृष्णाजी कुराडे यांच्याकडून जागा खरेदी केली आहे. ते वि.प.चे ग्राहक नाहीत.

मुद्दा क्र. ५: आदेश ?
उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

श्री. मनोहर कृष्णाजी कुराडे यांनी कैं.जनार्दन कृष्णाजी कुराडे यांच्याकडून खरेदीखताने दि. ३०.३.१९९५ रोजी सि.स.नं.१३९९ घर क्र. १२५७/२ हि जागा घेतली. सदर जागेत व्यवसायासाठी १० एच.पी. मोटीव्ह पॉवर व एक घरगुती वापरासाठीचे कनेक्शन अशी २ कनेक्शन्सची मागणी वि.प.कडे दि. ९.१.२००७ रोजी नोंदविल्याचे दिसून येते. वि.प.ने प्रस्तुतकामी पुढील कार्यवाहीसाठी रु. ५०/– इतकी प्रोसेसिंग फी दि. ९.१.२००७ रोजी भरुन घेतली. पुढील कार्यवाहीत मागणी केलेल्या जागेत वीज कनेक्शन चालू होती व सदरची कनेक्शन थकबाकीसाठी कायमची बंद केली असल्याने थकबाकीची रक्कम जमा होईपर्यंत नवीन जोडणी देता येणार नाही असे वि.प.ने पत्र क्र. ३६७८ दि.२१.१०.२००८ च्या कार्यालयीन पत्र–व्यवहारात नमूद केले आहे. त्यात –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मोतीराम कृष्णाजी कुराडे | ग्रा.क्र. २५०३८००७७१३९/५ | रु. १,४९,९७२.६९ |
| २) | महादेव कृष्णाजी कुराडे | ग्रा.क्र. २५०३८००७७५३८/५ | रु. १,४०,४७९.७९ |
| ३) | मोतीराम कृष्णाजी कुराडे | ग्रा.क्र. २५०६५२०८७३३३/५ | रु. २४,४१८.६३ |

अशी खातेदारांची नांवे, ग्राहक क्रमांक व थकबाकी रक्कम इ. तपशिलाने कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, इचलकरंजी यांना सहा.अभियंता, ब उप विभागाने कळविल्याचे दिसते. माहिती अधिकाराच्या मागणी अंतर्गत पत्रास दि. ४.१२.२००८ रोजी पत्र क्र. ४१६१ ने माहिती देतांना त्यात श्री. मोतीराम जनार्दन कुराडे ग्रा.क्र. ८७३३३/५ ऐवजी श्री. जनार्दन कृ. कुराडे यांच्या नावाचा उल्लेख नोंदविला आहे. म्हणणे नेमके २५०६५२०८७३३/०५ हे खाते श्री. मोतीराम कुराडे की श्री. जनार्दन कुराडे यांचे नांवे आहे हा वि.प.चा गोंधळ आहे. मात्र मंचात हजर केलेले दि. १७.४.२००९ रोजीचे पत्र क्र. १८२५ ने सदरचे खाते श्री. मोतीराम कुराडे यांच्याच नावांने चालू असल्याचे व त्यांच्याच नावांवर थकबाकी असल्याचे दिसून येते. तसेच वर नमूद केलेल्या तिन्हीही खातेदारांची सीपीएल वि.प.ने मंचात दाखल केलेली आहेत. त्यात श्री. जनार्दन कृ. कुराडे यांच्या नांवे कोणतेच खाते नाही व थकबाकीही नाही. सर्व खाती श्री. कुराडे याच नावाने होती व मागणीही श्री. मनोहर कुराडे यांनी केल्याने सदर ठिकाणी थकबाकी असल्याने वि.प.ने तसे धोरण अवलंबले असावे असे वाटते. उभयतांनी बराच पत्र-व्यवहार केल्याचे दिसून येते. तीनही खात्यावर दि. १३.२.२००२ रोजी हि रक्कम जमा केल्याची तारीख नोंद आहे पण प्रत्यक्षात दि. १३.२.२००२ नंतर तीनही खाती सप्टेंबर २००४ पर्यंत चालू होती, म्हणजे जवळ जवळ २ वर्षे थकबाकी वसुलीसाठी वि.प.ने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. दि. १३२.२००२ रोजी असलेली थकबाकी रक्कम व सप्टेंबर २००४ला बंद करतेवेळेची बाकी पुढील प्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) २५०३८०००७७५३८ | १३२.२००२ | सप्टेंबर २००४ |
| | रु. १,५५,९२५१८ | रु. १,४०,०५३०५ |
| २) २५०३८०००७७१३९ | रु. १,२२,६६३.०७ | रु. १,४९,९७७.५५ |
| ३) २५०६५२०८७३३३ | रु. १७,३३४.२५ | रु. ३२,२५३.३१ |

सप्टेंबर २००४ च्या थकबाकीचीच मागणी वि.प. करत आहे व ते चुकीचे आहे, कारण सन २००० पासून यंत्रमाग व्यवसायासाठी प्रथमत: मे २००० पासून नोव्हेंबर २००३ पर्यंत एचपी वापर प्रमाणे बिलाची आकारणी व नंतर सबसिडी दराप्रमाणे बिले होत होती. प्रत्यक्षात सीपीएल हे एमईआरसीच्या दराने होत होते. त्यामुळे दरखेपेस बील दुरुस्त करुन द्यावे लागत होते. शासनानेही हि यंत्रमागास ' संजीवनीच्या 'रुपाने मार्च २००४ च्या थकबाकीवर सवलत दिलेली होती. या सर्व पार्श्वभूमिचा विचार करुन नेमकी बाकी वि.प.ने कळविणे आवश्यक होते, तसेच वि.प.ने केलेले नाही. त्यामुळे सीपीएल वरील बाकी हि वसुलीयोग्य रक्कम नाही. वि.प.ने आपल्या दि. १७.४.२००९ पत्र क्र. ०१८२५ मंचास सादर केलेल्या व थकबाकीची पत्रात त्याच वाक्याची नोंद केलेली दिसते. थकबाकी दि.१३.२.२००२ पासूनची असल्याचे व सप्टेंबर २००४ पर्यंत सर्व कनेक्शन्स चालू असल्याचे सीपीएल वरुन दिसून येते. दि. १३.२.२००२ पासून ग्राहकाने नवीन मागणी केलेला अर्ज दि. ९.१.२००७ पर्यंत व नंतरही थकबाकी वसुलीसाठी कायदेशीर प्रयत्न केलेले अथवा मिळकतीवर बोजा नोंदविलेला दिसून येत नाही. त्यामुळे सदर थकबाकी असूनही मागणी केलेल्या अर्जदारावर कोणतीही कायदेशीर जबाबदारी येत नाही. तथापि, विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी मधील विनियम १०:५ नुसार येणारा बोजा जास्तीत जास्त सहा महिने अगोदर पर्यंतच्या कालावधीत फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या विजेच्या चुकत्या न केलेल्या आकारा इतकाच मर्यादित राहिल. त्यामुळे वरील ठिकाणी ज्या जोडण्या चालू होत्या त्या सप्टेंबर २००४ ला कायमच्या बंद केला असल्याने मार्च २००४ ते सप्टेंबर २००४ पर्यंतच्या वरील तीन ग्राहकांच्या सीपीएल वरील नोंदीप्रमाणे (वीज आकार व अन्य आकार) खालील तक्त्याप्रमाणे रक्कम रु.३९६२.९६ ग्राहकाने जमा केल्यावर अर्जासंबंधी पुढील कार्यवाही करावी.

| अ.क्र. | नांव श्रीयुत | ग्राहक क्रमांक | | एप्रिल २००४ | जुलैं २००४ | सप्टेंबर २००४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महादेव कृष्णाजी कुराडे | २५०३८००७७५३८ | | | | |
| | १४३८.०८ | | फिक्स चार्जेस | १८०.०० | ०० | ०० |
| | ४२४.०० | | विद्युत आकार | ९२०.०० | ४००.०० | ४००.०० |
| | ४२४.०० | | विद्युत ड्यूटी | ७०.०८ | २४.०० | २४.०० |
| | २२८६.०८ | | एफ.सी. अे. | ६८.०० | ०० | ०० |
| | | | टीडीएल चार्ज | २००.०० | ०० | ०० |
| | | | **एकूण** | **१४३८.००** | **४२४.००** | **४२४.००** |
| | | | | | | |
| २ | मोतीराम कृष्णाजी कुराडे | २५०३८००७७१३९ | फिक्स चार्जेस | ३००.०० | ०० | ०० |
| | ३८०.९६ | | विद्युत आकार | ४६.०० | २००० | २०.०० |
| | २१.२० | | विद्युत ड्यूटी | २०.९६ | १.२१ | १.२० |
| | २१.२० | | एफ.सी. अे. | ३.४० | ०० | ०० |
| | ४२२.७६ | | टीडीएल चार्ज | १०.०० | ०० | ०० |
| | | | **एकूण** | **३८०.३६** | **२१.२०** | **२१.२०** |
| ३ | मोतीराम कृष्णाजी कुराडे | २५०६५२०८७३३३ | फिक्स चार्जेस | २००.०० | २००.०० | २००.०० |
| | ४०५.३३ | | विद्युत आकार | १४८.८० | १४८.८० | १७७.६० |
| | ४०९.२७ | | विद्युत ड्यूटी | २१.१९ | २१.४९ | २२.७४ |
| | ४३८.८२ | | एफ.सी. अे. | ४.३४ | ८.०६ | १.४८ |
| | १२५३.५२ | | टीडीएल चार्ज | ३१.०० | ३१.०० | ३७.०० |
| | **असे एकूण तीन ग्राहकांची बील रक्कम** | | **एकूण** | **४०५.३३** | **४०९.२७** | **४३८.८२** |
| | २२८६.०८ | | | | | |
| | ४२२.७६ | | | | | |
| | १२५३५२ | | | | | |
| | **३९६२.९६** | **इतकी रक्कम वसुलीयोग्य आहे.** | | | | |

वि.प.ने आपल्याकडील सर्व कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक होते. ग्राहकाने थकबाकीची मागणी नाकारलेली आहे. ग्राहकाने दि. ४.१२.२००७ रोजी संबंधित थकबाकीशी अर्जदाराचा संबंध नसल्याचे कळवून नंतर परत आपल्या वकीलाच्या मार्फतही दि. १७.९.२००८ ला कळविले आहे. त्यास वि.प.च्या वकीलांच्यातर्फे दि. १३.१०.२००८ ला उत्तर पाठवून सदर जागेत बाकी असल्यामुळे वीज जोडणी देता येत नसल्याचे कळविल्याचे दिसते. तथापि वीज कंपनीचे व एमईआरसीचे नियमानुसार सदर जागेतील जोडण्याची थकबाकी भागवले शिवाय जोडणी देता येणार नाही हे म्हणणे विनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. त्यामुळे वि.प.ने प्रोसेसिंग फी भरुन घेतल्यावर वितरण मेन्सचा विस्तार गृहित धरुन ३० दिवसांचे आत म्हणजेच दि. ९.२.२००७ पर्यंत ग्राहकाने करावयाचे खर्चाचे चलन देणे उचित होते. तसे वि.प.ने केलेले नाही. जुनी थकबाकी वसूल होणे आवश्यक आहे.

मात्र त्यासंबंधीच्या सर्व तरतुदी तपासून त्याप्रमाणे ग्राहकाला कळविणे आवश्यक होते, तसे न केल्याने पोकळ थकबाकीची रक्कम वसूल करण्याचा वि.प.चा खटाटोप निरर्थक व बिनबुडाचा आहे. याचा वि.प.च्या व्यवस्थापनाने विचार करावा. त्याचप्रमाणे अर्जदार हा देखील त्याच्या पूर्वीचे थकबाकीशी त्यांचा कांही संबंध नाही हेही त्यांचे म्हणणे एस.ओ.पी. मधील तरतुदीशी विसंगत आहे. सबब एस.ओ.पी. १० : ५ मधील तरतुदीप्रमाणे मागील ६ महिन्यांची बाकी भरुन घेणे आवश्यक आहे.

## आदेश

१) अंतर्गत कक्ष, कोल्हापूर यांचा आदेश क्र. १२०६ दि. १८.२.२००९ रद्द करणेत येत आहे.

२) तपशिलात उल्लेख केल्याप्रमाणे मार्च २००४ ते सप्टेंबर २००४ या सहा महिन्यांच्या बिलाची तीन खात्यावरील रक्कम रु. ३९६२.९६ ग्राहकाने विनियमातील तरतुदीप्रमाणे भरावे.

३) तपशिलात नोंदविल्याप्रमाणे खर्चाचे चलन ग्राहकाने भरुन कागदपत्रांची पूर्तता केल्यास दोन्हीही जोडण्या देणेत याव्यात.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य ग्राहक
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

दि. ०४.८.२००९

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :